दिलावरखान यास जास्तीत जास्त शिक्षा ठोठावणे क्रमप्राप्त ठरते. आरोपी क्र. २ साहेबराव खिल्लारे याच्या पुर्वीच्या गुन्ह्याची पार्श्वभूमी नाही. त्यामुळे त्यास सौम्य शिक्षा ठोठावणे न्यायोचित आहे. त्यामुळे एकंदरीत उपरोक्त कारणास्तव आरोपी क्र. १ दिलावत खान यास दोन वर्षे सक्षम कारावास व ५००/- रुपये दंड तसेच आरोपी क्र. २ साहेबराव यास सहा महिने साधा कारावास व ५००/- रुपये दंड ठोठावणे न्यायोचित राहील. करिता उपरोक्त कारणास्तव मुददयास त्याप्रमाणे निष्कर्ष देवून मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीं क्र. १ दिलावतखान शब्बीरखान पठाण व आरोपी क्र. २ साहेबराव यास भा.दं.वि. चे कलम ३७९ सह कलम ३४ अंतर्गत गुन्ह्याचे शिक्षेसाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलन २४८(२) अंतर्गत दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपी क्र. १ दिलावतखान शब्बीरखान पठाण यास चोरीच्या सिध्द दोषासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(२) अंतर्गत दोन वर्षे सश्रम कारावास व ५००/- रुपये दंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास ७ दिवसाचा साधा कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

३. आरोपी क्र. २ साहेबराव यास चोरीच्या सिध्द दोषासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(२) अंतर्गत सहा महिने साधा कारावास व ५००/- रुपये दंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास ७ दिवसाचा साधा कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

४. आरोपी क्र. १ व २ हे दिनांक २५.०८.२०१७ पासून जेलमध्ये आहेत त्यामुळे त्यांना फौ. प्र सं कलम ४२८ अंतर्गत एकूण ३ महिने १० दिवसासाठी करावासाच्या शिक्षेतून वजावट देण्यात येत आहे.